दै. पुण्यनगरी दि. ०९/११/२०२३

# स्थागुशाने गावठी पिस्टलसह एकाला घेतले ताब्यात

**नांदेड/प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन पथकाने दि. ७ नोव्हेंबर रोजी रात्री १.४० वाजता २८ वर्षीय युवकाला ताब्यात घेतले.त्याच्याकडून एका बुलेटसह एक गावठी पिस्टल व काडतुसे असा एकुण १ लाख ७८ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दि.७ व ८ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात नाकाबंदी व कोबींग ऑपरेशन राबविण्याच्या सुचना दिल्या होत्या. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी स्थागुशाची दोन पथके तयार करुन पंचासह नांदेड शहरात रवाना केली. विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एका गुन्ह्यातील फरार आरोपी रोहन कांबळे येणार असल्याची माहीती मिळाली. त्यावरुन या पथकाने आसना नदीच्या अलीकडे असलेल्या चौकात नाकाबंदी केली. दि.७ नोव्हेंबर रोजी रात्री १.४० वाजता रोहन काबंळे (२८) रा.सिद्धार्थनगर, तरोडा बु.नांदेड याला



एक गावठी पिस्टल, ३ जिवंत काडतुसे व एक बुलेट असे एकुण १ लाख ७८ हजार रुपयाच्या ऐवजासह जेरबंद केले.या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात ४४०/२३ नुसार येथे नोंद करण्यात आला आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एका गुन्ह्यात तो फरार होता, अशी माहिती समोर आली आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, पोउपनि दत्तात्रय काळे, जमादार गंगाधर कदम, बालाजी तेलंग, पोकॉ गणेश धुमाळ, रणधीर राजबन्सी, ज्वालासिंग बावरी, गजानन बैनवाड, देवा चव्हाण, चालक पोकॉ बालाजी मुंडे यांनी ही कारवाई केली. पोलीस अधीक्षकांनी या पथकातील कर्मचाऱ्यांचे कौतूक केले आहे.